माहिती हवीय?

अशोक परब, ठाणे.

□ पहिला मल्टीस्टारर म्हणून कोणत्या चित्रपटाचं नाव घेता येईल?

— १९५४च्या बॉम्बे टॉकीजच्या *बादबाद* या चित्रपटाचे अशोककुमार, देव आनंद, मीनाकुमारी, उषा किरण, शेख मुख्तार, जयराज गोप, लीला चिटणीस हे पन्नासच्या दशकातील लोकप्रिय कलावंत या चित्रपटात एकत्र आले होते. आणि शेवटची घरघर लागलेल्या बॉम्बे टॉकीजला वाचवण्यासाठी या सर्वांनी या चित्रपटात एक पैसाही न घेता विनामूल्य काम केलं होतं. तरीही बॉम्बे टॉकीज काही वाचली नाही. *बादबाद*नेच बॉम्बे टॉकीजचा शेवट झाला.


रविकांत साखरे, जामखेड, कुंभारतळे.

□ सोनिक ओमी यांनी संगीतबद्ध केलेले चित्रपट कोणकोणते? दिग्दर्शक कोण?

— सोनिक-ओमी यांची जोडी काका-पुतण्याची जोडी. सोनिक काका, ओमी पुतणे. पुतण्याशी आपली जोडी जमवण्यापूर्वी सोनिकने एकट्याने १९५२ला दादा गुंजाल दिग्दर्शित *ममता* या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन एकट्याने केले होते आणि त्याआधी १९५१ला दादा गुंजाल दिग्दर्शित *इश्वरभक्ती* या चित्रपटाचे संगीत-दिग्दर्शन गिरधर यांचेबरोबर. *ममता*नंतर ते रोशन व उषा खन्नाकडे ॲरेंजर म्हणून काम करीत होते. १९६६ला त्यांनी सी. एल. रावल दिग्दर्शित *दिल ने फिर याद किया* चित्रपटात ओमीबरोबर सर्वात प्रथम आपली जोडी जमवली. त्यानंतर या जोडीने *आबरू*(दिग्दर्शक सी. एल. रावल), *बेटी*(दिग्दर्शक हरमेश मल्होत्रा), *महुआ* (दिग्दर्शक बी. मित्रा), मि. *मर्डर*(दिग्दर्शक एन. ए. अन्सारी), *सोल्जर*(दिग्दर्शक श्यामलाल रायपूर), *मुजरिम*(दिग्दर्शक केवल मिश्रा), *सावन भादो*(दिग्दर्शक मोहन सायगल), *ट्रक ड्रायव्हर*(दिग्दर्शक धर्मा), *दोस्त और दुश्मन*(दिग्दर्शक केवल मिश्रा), *लडकी पसंद है*(दिग्दर्शक सी. एल. रावल), *मेमसाब*(दिग्दर्शक आत्माराम), *भाई हो तो ऐसा*(दिग्दर्शक मनमोहन देसाई), *दो यार*(दिग्दर्शक केवल मिश्रा), *दो बच्चे दस हात*(दिग्दर्शक परवेज), *डॉक्टर एक्स*(दिग्दर्शक बी. गुप्ता), *एक खिलाडी बावन्न पत्ते*(दिग्दर्शक रवी खन्ना), *सजा*(दिग्दर्शक चांद), *आंगठा*(दिग्दर्शक नासीर हुसेन), *बिंदिया और बंदूक*(दिग्दर्शक शिबू मित्रा), *धर्मा*(दिग्दर्शक चांद), *तीन चार*(दिग्दर्शक दादा मिराशी), *वही रात वही आवाज*(दिग्दर्शक देव किशन), *यौवन* (दिग्दर्शक रंजन बोस), *दो चट्टानें*(दिग्दर्शक जी. एच. करीन), *खून की किमत*(दिग्दर्शक शिबू मित्रा), *वो मैं नहीं*(दिग्दर्शक मोहन सायगल), *अंधेरा* (दिग्दर्शक तुलसी रामसे, श्याम रामसे), *जग्गू* (दिग्दर्शक समीर गांगुली), *रफ्तार*(दिग्दर्शक दिनेश रमेश), *उम्र कैद*(दिग्दर्शक सिकंदर खन्ना), *फौजी* (दिग्दर्शक जागिंदर), *शंकर दादा*(दिग्दर्शक शिबू मित्रा), *यारी झिंदाबाद* (दिग्दर्शक जोगींदर), *दो चेहरे*(दिग्दर्शक केवल मिश्रा), *दो शोले*(दिग्दर्शक सुखदेव अहलू वालिया), *लडकी जवान हो गयी*(दिग्दर्शक आनंद दासानी), *पंडित और पठाण*(दिग्दर्शक जोगींदर), *जमानत*(दिग्दर्शक सलाम), *अपना खून*(दिग्दर्शक बी. सुभाष), *भूख*(दिग्दर्शक दिनेश रमणेरा), *भक्ती मे शक्ती*(दिग्दर्शक दारासिंग), *चौकी नं. ११८*(दिग्दर्शक व्ही. के. सोबती), *रामकसम*(दिग्दर्शक चांद), *लाखन* (दिग्दर्शक दिनेश रमणेरा), *राखी की सौगंध* (दिग्दर्शक शिबू मित्रा), *जुल्म की पुकार* (दिग्दर्शक दिनेश रमणेरा), *बदला और बलिदान*(दिग्दर्शक केवल मिश्रा), *अंगार* (दिग्दर्शक अशोक रॉय), *लहू पुकारेगा* (दिग्दर्शक अख्तर-उल-इमान), *तीन एक्के* (दिग्दर्शक जोगिंदर), *ज्वाला डाकू*(दिग्दर्शक आर. पी. स्वामी), *खून की टक्कर*(हरीश चावला), *बेगुनाह कैदी*(व्ही. के. सोबती), *हीरो का चोर*(एस. के. कपूर), *कसम दुर्गा की*(दिग्दर्शक जोगिंदर), *दुर्गा*(दिग्दर्शक शिबू मित्रा), *चार महारथी*(दिग्दर्शक एस. वारिस अली), *रामकली*(दिग्दर्शक श्याम रल्हन), *जुल्म का बदला*(दिग्दर्शक के. प्रसाद), *आदमखोर*(दिग्दर्शक जोगिंदर), *चंबल के बादशहा*(एस. दिनेश), *राम मिलाये जोडी*(दिग्दर्शक एस. कव्वल), *फकिर बादशहा* (दिग्दर्शक सुभाष), *गोरा* (दिग्दर्शक दिनेश गौतम), *हमारी जंग* (दिग्दर्शक राजेश भादुरी), *जागो हुआ सवेरा* (दिग्दर्शक शौकत जमाली), *सीतापूर की गीता*(दिग्दर्शक शिबू मित्रा) या चित्रपटांना संगीत दिलं.

लविना फर्नांडिस, मालवण.

□ *नॉट ओन्ली मिसेस राऊत*च्या आधीचा गजेंद्र अहिरे यांचा चित्रपट कोणता? त्यातील कलाकार कोण?



गजेंद्र अहिरे लिखित *नॉट ओन्ली मिसेस राऊत*मध्ये मध्यवर्ती भूमिकेत अदिती देशपांडे

— २००२चा *कृष्णाकाठची मीरा*! गजेंद्र अहिरे या चित्रपटांचे सब कुछ म्हणजे निर्माता-दिग्दर्शक कथा-पटकथा, संवाद लेखक, गीतकार होते. कलाकार पंकज विष्णू, वृंदा गजेंद्र, दीपा परब, श्रीकांत मोघे, विनय आपटे, मानसी मागीकर, किशोर नांदलस्कर, नंदू जाधव, शिवा कदम, लेवा राणे.

राजश्री सावंत, बडोदे.

□ किमी काटकरने भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायक कोण?

— *पत्थर दिल*(जैनेंद्र), *टारजन*(हेमंत बिर्जे), *दोस्तो दुश्मनो*(ऋषी कपूर), *मेरा लहू* (गोविंदा), *दरिया दिल*(गोविंदा), *हम* (अमिताभ), *काला बाजार, अभिमन्यू* (अनिल कपूर), *हमला*(धर्मेंद्र), *शिवशक्ती, तोहफा मोहब्बत का, जैसी करनी वैसी भरनी, तकदीर का तमाशा, जुल्म की हुकूमत*(गोविंदा), *वर्दी*(जॅकी श्रॉफ), *मुल्जिम*(जितेंद्र), *नंबरी आदमी, रोटी की किमत, हम से न टकराना, मेरी जुबान*(मिथुन चक्रवर्ती), *खोज*(ऋषी कपूर), *सरफिरा*(संजय दत्त), *कारनामा*(विनोद खन्ना) हे किमी काटकरने भूमिका केलेले ठळक चित्रपट. *एक फूल चार हाफ* या मराठी चित्रपटात तिने पाहुणी कलाकार म्हणून काम केलं होतं. ✯